माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग

दुर.क्र.०२५३ २२३२७६४ पिनॅकल मॉल, चौथा मजला, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दाखल द्वितीय अपील**

**क्रमांक : द्वितीय अपील -२१९/२०२४/जळगाव**

| द्वितीय अपील कर्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| सतीश रामगिर गोसावी रा.११४, स्वामी समर्थ नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार ४२५४१२ | वनपरिक्षेत्र अधिकारी, ( प्रादेशिक ) पारोळा वनविभाग, पारोळा, ता. पारोळा, जि. जळगाव | सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव ), जळगाव वनविभाग जळगाव यांचे कार्यालय, जळगाव प्रशासकीय इमारत, टप्पा-३, आकाशवाणी केंद्राजवळ, जळगाव ता. जि. जळगाव - ४२५००१ |

**सुनावणीचा/आदेशाचा दिनांक : १७/५/२०२४**

अपिलार्थी यांनी दि.०३/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती पुरविली नाही " असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), पारोळा उपस्थित आहेत आणि अपीलार्थी व अन्य पक्षकार अनुपस्थित आहेत .

३. अपिलार्थी यांनी दिनांक २२/६/२०२३ च्या मूळ अर्जान्वये वर नमूद केलेल्या जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करून, खालीलप्रमाणे माहिती मिळण्याची विनंती केली आहे.

क) दिनांक १/४/२०२२ ते दिनांक ३१/३/२०२३ या कालावधीतील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत बांबू रोपवन, खैर लागवड, दगडी शुल्क बंधारे बांधणे, वणीकरणाच्या भरगच्च कार्यक्रम अंतर्गत निकृष्ट वनाचे वनीकरण करणे कामावरील गावानुसार मंजुरांची नावे व त्यांना देण्यात आलेली रक्कम तसेच बँकेच्या पास बूकची नक्कल व सेटेलाइट द्वारे घेतलेल्या छायाचित्राची सीडी याबाबतची माहिती.

४. तसेच या प्रकरणात अपिलार्थी यांनी दिनांक २२/८/२०२३ प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अधिनियमाच्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले आहे.

५. सुनावणीदरम्यान, उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), पारोळा यांनी असे नमूद केले की अपीलकर्ता यांना दिनांक १८/७/२०२३ रोजी अवलोकनाची संधी देण्यात आली होती तसेच दिनांक ६/१०/२०२३ रोजी प्रथम अपील आदेश पारित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दिनांक २१/२/२०२४ चे लेखी निवेदन आयोगास सादर केले असून त्यामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, “द्वितीत अपील दाखल केल्यानंतर मूळ अर्जान्वये मागितलेली माहितीचे अवलोकन करण्याची संधि मला जन माहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे त्यामुळे आता माझे दोन्ही मूळ अर्ज दिनांक २२/६/२०२३ वअ प्रथम अपील अर्ज दिनांक २२/८/२०२३ वअ आपणकडील दोन्ही द्वितीय अपील दिनांक ३/१/२०२४ निकाली काढावे ही विनंती.”

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

प्रस्तुतचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त, नाशिक खंडपीठ

आ=९४३८ 28 MAY 2024